महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सेक्टर ११, सरोवर विहार समोर, बेलापूर सीबीडी, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : सीएमए-०४२३/प्र.क्र.-१२८/२०२५/जाहिरात दिनांक:- १४ ऑगस्ट, २०२५

## -: शुद्धिपत्रक :-

# महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा - २०२५

**(जाहिरात क्रमांक: ११७/२०२५, दिनांक २९ जुलै, २०२५)**

महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा - २०२५ करीता दिनांक २९ जुलै, २०२५ रोजी विविध संवर्गांच्या एकूण २८२ रिक्त पदांकरीता जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. विषयांकित परीक्षेची जाहिरात प्रसिद्ध केल्यानंतर शासनाच्या गृह विभागाकडून शासन पत्र क्रमांक : पोलीस -११२४/प्र.क्र.२४९/पोल-५अ, दिनांक ११ ऑगस्ट, २०२५ द्वारे पोलीस उपनिरीक्षक संवर्गाच्या एकूण ३९२ पदांकरीता मागणीपत्र प्राप्त झाले आहे. जाहिरातीमधील परिच्छेद ४.२ मधील तरतूदी नुसार पोलीस उपनिरीक्षक संवर्गातील पदांचा समावेश महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा - २०२५ मध्ये करण्यात येत आहे.

**२.** शासनाकडून प्राप्त मागणीपत्रानुसार महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा - २०२५ परीक्षेमधून भरावयाच्या पोलीस उपनिरीक्षक संवर्गातील एकूण **३९२** पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

**(३) पोलीस उपनिरीक्षक (एकूण ३९२ पदे)**

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व. | वि.मा.प्र. | सा. आणि शै. मागास वर्ग. | आ.दु.घ. | एकूण आरक्षित पदे | अराखीव पदे | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | ४३ | ३१ | २१ | ९ | ९ | ५ | ८३ | ३ | ३९ | ३९ | २८२ | ११० | ३९२ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | | |
| (१) सर्वसाधारण | २८ | २० | १४ | ७ | ५ | ३ | ५४ | २ | २५ | २५ | १८३ | ७१ | २५४ |
| (२) महिला | १३ | ९ | ६ | २ | ३ | २ | २५ | १ | १२ | १२ | ८५ | ३३ | ११८ |
| (३) खेळाडू | २ | २ | १ | -- | १ | -- | ४ | -- | २ | २ | १४ | ६ | २० |
| (४) दिव्यांग | -- | | | | | | | | | | | | |
| (५) अनाथ | एकूण ४ पदे — २ संस्थात्मक, ०२ — संस्थाबाह्य | | | | | | | | | | | | |

**३. पात्रता :-**

**३.१ भारतीय नागरिकत्व**

**३.२ वयोमर्यादा :-**

<table>
<tr><th rowspan="3">वयोमर्यादा गणण्याचा दिनांक</th><th rowspan="3">किमान वय<br>अमागास / मागासवर्गीय/ आ. दु. घ.</th><th colspan="7">कमाल वय</th></tr>
<tr><th rowspan="2">अराखीव (खुला)</th><th rowspan="2">मागासवर्गीय /आ.दु.घ./ अनाथ</th><th colspan="2">प्राविण्य प्राप्त खेळाडू</th><th colspan="2">माजी सैनिक, आणिबाणी व अल्पसेवा राजदिष्ट अधिकारी</th><th rowspan="2">दिव्यांग उमेदवार</th></tr>
<tr><th>अराखीव (खुला)</th><th>मागासवर्गीय/ आ.दु.घ./ अनाथ</th><th>अराखीव (खुला)</th><th>मागासवर्गीय/ आ.दु.घ./ अनाथ</th></tr>
<tr><td>०१ नोव्हेंबर, २०२५</td><td>१९</td><td>३१</td><td>३४</td><td>३६</td><td>३६</td><td colspan="2">३६</td><td>अपात्र</td></tr>
</table>

**३.३** मागासवर्गीय उमेदवार, दिव्यांग, खेळाडू आणि अनाथ उमेदवार यांना असलेली वयोमर्यादेतील शिथिलतेची सवलत यापैकी कोणतेही अधिकत्तम असलेली एकच सवलत देय राहील.

**३.४** विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.

**३.५. शैक्षणिक अर्हता :-**

**(एक)** सांविधिक विद्यापीठाची पदवी किंवा तिच्याशी समतुल्य असणारी शासनाने घोषित केलेली इतर कोणतीही तत्सम अर्हता.

**(दोन)** पदवी परीक्षेस बसलेले उमेदवार प्रस्तुत संयुक्त पूर्व परीक्षेस तात्पुरते पात्र असतील. परंतु संयुक्त पूर्व परीक्षेच्या निकालाआधारे संबंधित संवर्गाकरीता घेण्यात येणा-या मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरणा-या उमेदवारांनी संबंधित संवर्गाच्या मुख्य परीक्षेकरीता अर्ज स्वीकारण्यासाठी विहित केलेल्या अंतिम दिनांकापर्यंत पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

**(तीन)** अंतर्वासिता (Internship) किंवा कार्यशाळेतील कामाचा अनुभव आवश्यक असेल अशा पदवीधारकाने ही अट मुख्य परीक्षेचे अर्ज स्वीकारण्याच्या विहित अंतिम दिनांकापर्यंत पूर्ण केली असली पाहीजे.

**(चार)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.

**३.६ शारीरिक पात्रता :-**

**(एक)** पोलीस उपनिरीक्षक संवर्गाकरीता उमेदवारांकडे उपरोक्त अर्हतेसोबत खालीलप्रमाणे किमान शारीरिक पात्रता असणे आवश्यक आहे :-

| शारीरिक मोजमाप | पुरुष | महिला | उभयलिंगी |
|---|---|---|---|
| उंची | किमान १६५ सें. मी. (अनवाणी) | किमान १५७ सें.मी. (अनवाणी) | (अ) स्वत:ची लिंग ओळख पुरूष अशी केलेल्या उमेदवारांसाठी - किमान १६५ सें.मी.<br>(ब) स्वत:ची लिंग ओळख महिला/तृतीय पंथी अशी केलेल्या उमेदवारांसाठी - किमान १५७ सें.मी. |
| छाती | न फुगविता ७९ से.मी. फुगविण्याची क्षमता किमान ५ से.मी. आवश्यक | आवश्यक नाही | स्वत:ची लिंग ओळख महिला/पुरुष/तृतीय पंथी अशी केलेल्या उमेदवारांसाठी - आवश्यक नाही. |

**(दोन)** संबंधित संवर्गातील नियुक्तीकरीता शिफारस पात्र उमेदवारांची शारीरिक मोजमापे नियुक्ती करण्यापूर्वी शासनामार्फत सक्षम प्राधिका-याकडून तपासून घेण्यात येतील. विहित शारीरिक पात्रता नसल्यास संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी अपात्र ठरेल.

**३.७ अर्हता/पात्रता गणण्याचा दिनांक :-**

**मुख्य परीक्षेकरीता अर्ज स्वीकारण्यासाठी विहित अंतिम दिनांकापर्यंत किंवा त्यापूर्वी विहित शैक्षणिक अर्हता धारण केलेली असणे अनिवार्य आहे.**

**४.** शासन निर्णय, गृह विभाग क्रमांक पोलीस-१८२१/ प्र.क्र.५२/पोल-५अ, दिनांक ०४ ऑगस्ट, २०२१ अनुसार पोलीस उपनिरीक्षक संवर्गाकरीता दिव्यांग उमेदवार पात्र नाही.

**५.** विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.

**६.** पोलीस उपनिरीक्षक संवर्गाकरीता **वयोमर्यादा** गणण्याचा दिनांक हा मूळ जाहिरातीमधील तरतुदीनुसार म्हणजेच **०१ नोव्हेंबर, २०२५** असा राहील.

**७.** महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा - २०२५ च्या मूळ जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या अर्ज सादर करताना अपलोड करावयाच्या सर्व कागदपत्रांसंबंधीच्या तरतुदी प्रस्तुत शुद्धिपत्रकाकरिता लागू राहतील. सदर तरतुदीनुसार उमेदवारांनी कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक राहील.

**८.** प्रस्तुत शुद्धिपत्रकान्वये महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा - २०२५ मधील पदसंख्येत बदल/सुधारणा झाल्यामुळे विषयांकित परीक्षेमधून एकूण ६७४ पदांकरीता भरतीप्रक्रिया राबविण्यात येईल.

**९.** प्रस्तुत शुद्धिपत्रकाच्या अनुषंगाने अर्ज स्वीकारण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशिलासाठी आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील **"उमेदवारांकरीता माहिती"** विभागातील **"सूचना"** अंतर्गत **"सर्वसाधारण सूचना"** तसेच **"परीक्षा" या सदराखालील "परीक्षा योजना"** विभागातील **"महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त परीक्षा"** मध्ये तसेच पूर्व परीक्षा व मुख्य परीक्षेचा अभ्यासक्रम **"उमेदवारांकरीता माहिती"** विभागातील **"परीक्षा"** अंतर्गत **"अभ्यासक्रम "** येथे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे.

**१०.** दिनांक २९ जुलै, २०२५ रोजी प्रसिद्ध जाहिरातमधील इतर अटी व शर्तींमध्ये कोणताही बदल नाही.

उपसचिव,(जाहिरात)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग